# भूमिगत मेट्रोसाठी मुंबईकर उत्सुक

## सप्टेंबरअखेरपर्यंत काम पूर्ण होणार

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. १ : भूमिगत मेट्रोने आरे ते बीकेसीपर्यंतचा प्रवास करण्यासाठी मुंबईकर उत्सुक आहेत. त्यामुळे मेट्रो-३ चा पहिला टप्पा प्रवासी वाहतुकीसाठी कधी सुरू होणार, याबाबत एमएमआरसीएलकडे माहिती अधिकारातून विचारणा करण्यात आली होती. या वेळी सप्टेंबरअखेर पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण होईल, असे उत्तर एमएमआरसीएलने दिले आहे, पण प्रवाशांच्या सेवेत मेट्रो कधी धावणार याबाबतची संदिग्धता मात्र कायम आहे.

मेट्रोचा आरे-बीकेसी हा पहिला टप्पा सुरू करण्याबाबत गेल्या पाच महिन्यांपासून विविध तारखा जाहीर केल्या आहेत. सुरुवातीला एप्रिलमध्ये मेट्रो सेवेत येईल, अशी चर्चा होती. त्यानंतर भाजप नेते विनोद तावडे यांनी २४ जुलैपासून मेट्रो सेवेत येणार असल्याची पोस्ट केली होती. त्यामुळे मेट्रो-३ सुरू कधी सुरू होणार, याबाबत सातत्याने विचारणा होत असल्याने सामाजिक कार्यकर्ते गॉडफ्रे पिमेंटा यांनी माहिती अधिकारात विचारणा केली आहे.

महत्त्वाचे म्हणजे, भूमिगत मेट्रोमुळे मुंबईसह उपनगरातील वाहतूक कोंडी सुटणार आहे. त्यामुळे मुंबईकरांसाठी हा प्रकल्प अधिक महत्वपूर्ण आहे. पण एमएमआरसीएलने संप्टेबर अखेर काम पूर्ण होणार असल्याचे स्पष्ट केले आहे. पण सेवा कधी सुरू होणार याबाबत कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही.



**मुंबई** : आरे ते बीकेसीपर्यंतच्या भूमिगत मेट्रोचे काम सुरू आहे.

### पहिल्या टप्प्याची चाचणी यशस्वी

आरे ते बीकेसीपर्यंतचा पहिला टप्पा कधी सुरू होईल, हे स्पष्ट करण्याऐवजी सप्टेंबरअखेर काम पूर्ण होईल, तर बीकेसी-कफ परेड हा टप्पा फेब्रुवारी २०२५ मध्ये पूर्ण होईल, असे म्हटले आहे. तसेच मेट्रोच्या पहिल्या टप्प्याची आरडीएसओ चाचणी यशस्वीपणे पूर्ण झाली असून मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांनी सुरक्षा चाचणी केलेली नाही. त्यामुळे मेट्रो कधी सुरू होणार, हा प्रश्न मात्र अनुत्तरितच आहे.